# सहज शिक्षण

बालशिक्षण म्हणजे, सामान्यपणे, वयाच्या सहा वर्षांपर्यंतचे शिक्षण. या वयात मुलांचे आपापल्या घरांशी असलेले नाते घट्ट असते. त्यांचा अधिक वेळ घरांत जात असतो, त्यामुळे आपोआप होणारे त्यांचे शिक्षण अधिक काळ घरातच होत असते. अशा आपोआप म्हणजे कोणीही आवर्जून न शिकविता होणाऱ्या शिक्षणास 'सहज शिक्षण म्हणून संबोधले जाते.

जन्मल्यापासूनच मुलाचे सहज शिक्षण सुरू होत असते. आजूबाजूच्या जगाची ओळख करून घेण्याचा आटापीटा स्वयंप्रेरणेने मूल करत असते. ही बालकाची स्वयंशिक्षणाची सुरुवात असते. मुलाचा पहिला वहिला सामाजिक संपर्क हा घरातील नजिकच्या प्रौढ माणसांपासून, बहुधा आई-बाबांपासून सुरू होत असतो. सततचा संपर्क, नजिकचा सहवास यांमधून मिळणारी सुरक्षिततेची भावना हे बालकाच्या दृष्टीने स्वतःची गरज भागविणारे पहिले शिक्षण असते. तहान-भूक अशा नैसर्गिक गरजा भागविणारा असा प्रौढांकडून मिळणारा प्रतिसाद हा बालकाला प्राप्त होणारा सामाजिक संबंधाचा पहिला लाभ असतो.

आपल्या कर्मेंद्रियांचा नि ज्ञानेंद्रियांचा वापर करूनच बालकाचे सहज शिक्षण होत असते. असा वापर करून आपले शिक्षण करीत जाणे ही स्वयंस्फूर्त गोष्ट असते. आपल्या हाता-पायांची सततची हालचाल आणि कान-डोळे वगैरे अवयवांचा जाणीवपूर्वक वापर करणे या सहज गोष्टींचा संबंध बालकाच्या मेंदू विकासाशी असतो. मेंदूमधील पेशींना चेतापेशींना कार्यरत करण्यासाठी अशा कृतींची गरज असते, आणि बालक आपल्या या नैसर्गिक गरजांची सततच पूर्ती करीत असते, ती स्वयंस्फूर्त असते. बालक करीत असलेली शारीरिक हालचाल ही अप्रत्यक्षरित्या बालकाच्या मेंदूमधील क्षमतांचा विकास साधून, अंतिमतः बालकाच्या स्वयंशिक्षणाला सहाय्यच करीत असते.

___ बालकाचे कुटुंबांतर्गत, अगदी लहान वयांतच होणारे भाषाशिक्षणही, दुहेरी उपयोगाचे असते. मुले वयाच्या अठराव्या महिन्यांच्या आसपास आपल्या स्वतःच्या भाषाशिक्षणास सुरुवात करीत असते. बोलायला लागण्यापूर्वीच मूल घरातील इतरांनी बोललेली भाषा समजू लागलेले असते, भाषा समजावून घेऊन काही कृतीही करू लागलेले असते, भाषा अशी सातत्याने ऐकूनच समजावून घेतली जाते. घरात ऐकलेली, ऐकून समजावून घेतलेली आणि ऐकत ऐकत बोलून पाहिलेली भाषा ही, आपणहून आत्मसात केलेली अशी पहिली भाषा असते. मूल आपल्या कौटुंबिक परिसरात असलेली, वापरली जाणारी भाषा सहजतेने आत्मसात करीत जाते. भाषा आत्मसात होणे हे सहजशिक्षणाचे सर्वोत्तम असे उदाहरण असते. भाषेच्या स्वयंशिक्षणाचा सराव जसजसा होत जातो, तसतशी मेंदूमधील भाषाशिक्षणाच्या क्षमताही तीव्र होत जातात. तसेच वाढत्या भाषाशिक्षणाने मुलाचा कुटुंबातील आणि कुटुंबाबाहेरील समाजसंपर्कही बळकट होत जातो.

समाजसंपर्क जसजसा वाढत जातो तसतशी बालकाच्या सहज शिक्षणाची व्याप्ती वाढत जाते आणि गतीही वाढत जाते. प्रत्यक्ष भाषाशिक्षणाच्या क्षेत्रात या दोनही बाबी तीव्रतेने घडून येतात. भाषा, इतरांच्या संपर्कातून संपन्न होत जाते. मुलाचा शब्दसंग्रह वाढत जातो, शब्दांच्या, वाक्यांच्या विविध अर्थच्छटा आत्मसात होत जातात. भाषा ऐकायला, ऐकून समजायला आणि समजून बोलायला मुले लागतात ती आपल्या सहजप्रक्रियेचा वापर करूनच. भाषाशिक्षण हे सहज शिक्षणाचे सर्वात मोठे उदाहरण आहे.

मुले शाळेत जाऊ लागली, तिथे लिहायला, वाचायला शिकू लागली की त्यांच्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, त्यांचे सहज शिक्षण थांबते. उलट, सहज शिक्षणाचे क्षितिज अधिकच विस्तारते. मुले इतर मुलांच्या सहवासात परस्परांकडून अनेक गोष्टी आत्मसात करतात. त्यांचे वागणे, अनुकरण करणे, इतरांच्या सवयी, इतरांचे विचार आणि कल्पना, मुले सहजरित्या आपल्याशा करतात. औपचारिक शिक्षणाच्या पलीकडचे सारे विश्व हे असे सहज शिक्षणाचे विश्व असते. मुले मोठी झाली तरी हे सहज शिक्षणाचे कार्य चालूच असते. जसजसा समाजसंपर्क विस्तारतो तसतसे हे सहज शिक्षणाचे क्षितिजही, अर्थातच, विस्तारते. शाळांमधील औपचारिकतेच्या दबावाखाली सहज शिक्षणाची उपजत प्रक्रिया थबकल्यासारखी वाटत असली तरी शाळाबाह्य क्षेत्रात ती उफाळून येत असते, आपल्याला हवा तो वाव ती घेतच असते. लहान वयांतच आत्मसात केलेली ही किमया असते.

सहज शिक्षणाचे वैशिष्ट्य असे की, हे शिक्षण आजूबाजूच्या वातावरणातूनच होत असते. प्रगल्भ सांस्कृतिक वातावरणात, सहज शिक्षणाच्या भरपूर संधी उपलब्ध होत असतात. त्यांचा वापर करवून घेत मुले आपले व्यक्तिमत्व घडवित जातात. असे आवश्यक ते वातावरण पुरविणे हे शिक्षणविषयक फार मोठे सामाजिक कार्य आहे. वातावरणात असते ते आपसुख मुलांच्यात येते. त्यामुळे वातावरणात काय असावे, काय असू नये यांविषयीचे निर्णय समाजाला जाणीवपूर्वक व काळजीपूर्वक घ्यायचे असतात.

उदाहरणार्थ, मुलांच्या सहा वर्षांपर्यंतच्या वयात, म्हणजे ज्या वयात आपल्या विकासासाठी मुले अधिकाधिक स्वतःच्या घरावर, घरातील व्यक्तींवर आणि वातावरणावर अवलंबून असतात, त्या वयात घरचे वातावरण कसे असावे याचा पालकांनी विचार करायचा असतो. घरचे वातावरण बालकांच्या विकासास पोषक असे असले पाहिजे. ते घातक असून चालणार नाही. हाच काळ मुलांच्या मेंदूघडणीचा काळ असल्यामुळे, घरचे वातावरण मेंदूविकासाला पूरक असेच असावे लागेल. घरात मुलांचा सन्मान राखला जातोय, मुलांना भरपूर हुंदडता येते, भरपूर बडबड करता येते, भरपूर हसायला मिळते, मोकळेपणा मिळतो, हातापायांना भरपूर काम मिळते, घरातल्या सर्व कामांमध्ये लुडबूड करायला मिळते असे वातावरण हे बालकांच्या विकासासाठी आणि त्यासाठीच्या सहज शिक्षणास पोषक असे वातावरण म्हणता येईल. याउलट, जिथे सारखे रागावले जाते, क्षुल्लक गोष्टींवरून मार खावा लागतो, अपमानीत व्हावे लागते, जेथे नाचण्या-हुदडण्याला प्रतिबंध असतो, सारखे गप्पच बसावे लागते, घरातल्या कोणत्याही कामात घेतले जात नाही, पाहुण्यांशी आपणहून ओळख करून घेण्याची संधी दिली जात नाही, तेथे बालकांच्या सहज शिक्षणासच प्रतिबंध होतो. मुले बुजरी होतात, भित्री होतात किंवा कोडगी तरी होतात. घरचे वातावरणच सुदृढ असायला हवे. त्यासाठी मुलांबाबतचा पालकांचा दृष्टिकोण निरोगी असायला हवा. असे असले तर बालकांचे सहज होणारे शिक्षण वेगाने होते. सहज शिक्षण हेच खरे आनंददायी शिक्षण ठरते.

❖